CNRNO.MHSN07001037-2025

## सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.

(एम. ए. कुलकर्णी यांचे समक्ष)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ११९/२०२५**

वादी – शशिकांत शिवाजी कदम

विरुध्द

प्रतिवादीं – रावसाहेब भाऊसो जगताप उर्फ पाटील

.......................................................................................................

वादीतर्फे विधिज्ञ – श्री. व्ही. एस. कदम

प्रतिवादी तर्फे विधीज्ञ – श्री. एस. ए. पुरोहित

.......................................................................................................

**निशाणी क्र. ०५ वरील आदेश.**

**मिळकतीचे वर्णन –**

**अ) वादी नं. ५ शिवाजी निवृत्ती कदम यांची मिळकत –**

जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी कवठे महांकाळ पैकी मौजे म्हैशाळ (एम) येथील गट नंबर २५/२ (ब), क्षेत्र ०२ हे. ०० आर, आकार ०६ रु. ०१ पै. यांची मिळकत याची चतुःसिमा खालीलप्रमाणे –

पूर्वेस – ओढा,
पश्चिमेस – गट नं. २७ ची मिळकत

दक्षिणेस – ओढा

उत्तरेस – गट नं. २६ व २५/१ ची मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील शेतमिळकत त्यातील झाड, झुड, ताल, बांध तदंगभुत वस्तूसहित व सर्व इजमेंटरी हक्कासहीत शेतमिळकत –

**ब)** जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी कवठे महांकाळ पैकी मौजे म्हैशाळ (एम) येथील गट नंबर २६, क्षेत्र ०१ हे. ६५ आर, पो. ख. ० हे. ५५ आर, एकुण क्षेत्र ०२हे. २० आर, आकार ०१ रु. २५ पैसे याची चतुःसिमा खालीलप्रमाणे –

पूर्वेस – ओढा,

पश्चिमेस – गट नं. २५/१ ची मिळकत

दक्षिणेस – ओढा व गट नं. २५/२ ची मिळकत

उत्तरेस – म्हैशाळ शिव

येणेप्रमाणे चतुःसीमेतील शेतमिळकत त्यातील झाड, झुड, ताल, बांध तदंगभुत वस्तूसहीत व सर्व इजमेंटरी हक्कासहीत शेतमिळकत मधील वादी क्र. ३ दादासो ज्ञानू पवार यांचे क्षेत्र ० हे.४१ आर, आकार ० रू. ३१ पैसे, वादी क्र. ४ छाया भिमराव सावंत हिचे क्षेत्र ० हे.४१ आर, आकार ० रू. ३१ पैसे, वादी नं. २ शहाजी उर्फ शहाजीराव शिवाजी पवार याचे क्षेत्र ० हे.४१, आकार ० रू. ३१ पैसे, वादी नं. १ शशिकांत शिवाजी कदम यांचे क्षेत्र ० हे.४२ आर, आकार ० रू. ३८ पैसेची शेतमिळकत.

**क)** जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी कवठे महांकाळ पैकी मौजे हिंगणगांव येथील गट नं. १७६, क्षेत्र ०१ हे. २७ आर, आकार ०४ रू.७० पैसे

मधील वादी नं. २ शहाजी उर्फ शहाजीराव शिवाजी पवार याचे क्षेत्र ० हे. ४३ आर, आकार १ रू. ५९ पैसे यांसी चतुः सिमा खालीलप्रमाणे–

पुर्व – ओढा

पश्चिम – गट नं. १७७ ची मिळकत

दक्षिण – म्हैशाळ शिव

उत्तर – सदर गटातील रावसाहेब भाऊसो जगताप यांची मिळकत

येणेप्रमाणे चतुःसीमेतील शेतमिळकत त्यातील झाड, झुड, ताल, बांध तदंगभुत वस्तूसहीत व सर्व इजमेंटरी हक्कासहीत शेतमिळकत.

**०२.** वादीच्या अर्जाच्या कथनानुसार, वाद मिळकती १ अ व ब या वडीलार्जित असून दावा कलम १क मधील मिळकत ही वादीने दि. ०२.०२.२००८ रोजी शारदा मोहिते यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखत क्रमांक १२३/२००८ अन्वये खरेदी केलेले आहे. सदरच्या खरेदी खतापासून वादी क्र. २ यांची मालकी हक्काने कब्जे वहिवाट आहे. सदर मिळकतीमध्ये ऊस, मका, सोयाबीन, तूर, मूग इत्यादी पिके घेतलेली आहेत. वादीच्या मिळकतीच्या पूर्व बाजूस ओढा असून ओढयाच्या काठाने ५० ते ६० फुट उंच झाडाचा तट आहे.

**३.** वादीच्या पुढील कथनाप्रमाणे, वाद मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्क संबंध नसताना, प्रतिवादी यांनी वादीस दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमधून पूर्व बाजूने बांधावरुन हिंगणगाव मधील गट नं. १७६ मध्ये जाणे–येण्यासाठी गाडी रस्ता मिळावा म्हणून तहसिलदार कवठे महांकाळ यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज

दाखल केला होता. त्यानुसार तहसिलदार कवठे महांकाळ यांनी प्रकरण क्रमांक जमीन/रस्ता/१४३/एस आर/१७/२०२४ मध्ये दि. २५.०७.२०२५ रोजी आदेश देवून वादींच्या जमीनीमधून रस्ता मंजूर केलेला आहे. वादीच्या कथनानुसार सदर प्रकरण मंजूरी करीता केवळ तहसिलदार कवठे महांकाळ यांनी जागेवर जावून अथवा मिळकतीचा पंचनामा केलेला नाही अथवा वादी व प्रतिवादी यांना पुरावा देण्याची संधी देखील दिलेली नाही. त्यामुळे सदरचा आदेश पोकळ, बनावट व बेकायदेशीर असून वादीवर बंधनकारक नाही.

**४.** वादीच्या पुढील कथनानुसार, दावा मिळकतीमध्ये पुर्व बाजूकडून कोणत्याही स्वरुपाचा रस्ता नाही. वादी यांची संपूर्ण जमीन बागायती स्वरुपाची आहे. प्रतिवादी यांना त्यांची मिळकत गट क्र. १७६ मध्ये येण्या–जाण्यासाठी त्यांच्या उत्तरेकडील भागात करपे वस्ती ते करोली टी असा मुरमीकरण केलेला रस्ता आहे व त्याच्या पूर्वेस ओढा पात्र आहे. प्रतिवादी यांना असलेल्या पर्यायी रस्त्याचा विचार तहसिलदार कवठे महांकाळ यांनी केलेला नाही. वादीच्या पुढील कथनानुसार, महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार केवळ सरबांधाने रस्ता देण्याची तरतूद आहे, याही बाबींचा विचार तहसिलदार यांनी केलेला नाही.

**५.** वादीच्या पूढील कथनानुसार दि. ०१.०९.२०२५ रोजी प्रतिवादींने वाद मिळकतीमध्ये येवून तहसिलदार यांच्या आदेशानुसार रस्ता करणार असल्याची भाषा वापरली. प्रतिवादी हे राजकीय इसम असून त्यांचे गुंड लोकांशी संबंध आहेत. त्या जोरावरती प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये रस्ता केल्यास वादीचे

कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सोयीचा समतोल वादीच्या बाजूने आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**६.** प्रतिवादी यांनी निशाणी क्र. १७ वर कैफियत व अर्जास म्हणणे दाखल केले असून दाव्यातील सर्व कथनांना नकार दिला आहे. प्रतिवादीने अधिकचे म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा गट नं. १७६ हा हिंगणगाव हद्दीत वादीच्या जमीनीला लगत असून त्याठिकाणी प्रतिवादी यांचा जनावरांचा गोठा व वस्ती आहे. प्रतिवादी मागील अनेक दिवसांपासून वाद मिळकतीमधून ये–जा करत होता. परंतू वादींनी सदरचा रस्ता अडवल्यामुळे कायदेशीर बाबींचा अवलंब करुन त्यांना तहसिलदार कवठे महांकाळ यांच्याकडे रितसर अर्ज केला होता. त्यानुसार तहसिलदार यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकूण, स्थळ पाहणी करुन परिस्थितीचा विचार करुन रस्ता मंजूर केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार त्याला त्याच्या जमीनीत जाण्यासाठी इतर कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नाही.

**७.** प्रतिवादींनी सन १९८० साली रस्ता वहिवाटीसंबंधी प्रकरणाचा उल्लेख केला असून त्यानुसार सदर भागामध्ये पूर्व बाजूने रस्ता अस्तित्वात आहे. सदर प्रकरणानुसार पूर्वी गट नं. २७ पासून ते गट नं. २५/२ व २६ पर्यंत रस्ता मंजूर करण्यात आला होता. सदर रस्त्याची नोंद ग्रामपंचायत येथे असून पंचायत समिती मार्फत सदर रस्त्याची दुरूस्ती देखील करण्यात आलेली आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार केवळ सदर रस्त्यापासून ते प्रतिवादींच्या मिळकतीपर्यंत नवीन रस्ता मंजूर करण्यात आलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार त्यांना

त्यांच्या जमीनीमध्ये जाण्यासाठी सदर रस्त्याशिवाय इतर कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नाही.

८. प्रतिवादींनी या पूर्वी उपविभागिय अधिकारी मिरज यांच्याकडे अपील क्र. ८२८/२०२५ तसेच दिवाणी दावा देखील दाखल केला होता. परंतू दावा दाखल केल्यामुळे सदरचे अपील चालू शकले नाही. त्यामुळे वादींनी न्यायालयीन प्रक्रीयेचा गैरवापर केला आहे. तसेच यापूर्वी झालेल्या प्रकरणाचा उल्लेख दाव्यामध्ये केला नसल्याने वादी न्यायालयात स्वच्छ हाताने आलेले नाहीत.

९. प्रतिवादीच्या कथनानुसार गट नं. १७६ मध्ये त्यांची राहती वस्ती व जनावरांचा गोठा आहे. प्रतिवादींना वाद रस्त्याशिवाय इतर कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. वादींनी रस्ता न ठेवल्यामुळे प्रतिवादीचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे सोयीचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे. वादीस इतर पर्यायी रस्ता उपलब्ध आहेत, त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** वादीतर्फे विधिज्ञ व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. त्याचा सारासार विचार करुन या कामी मी खालील मुददे उपस्थित कले आहेत. त्यानुसार त्यांची कारणमीमांसा पुढे दिली आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | वादी आपली बाजु प्रथम दर्शनी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा.

**मुद्दा क्र. १ बाबत**

**११.** सदरचे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत कारणेमिमांसेकरिता घेण्यात येतात.

**१२.** वादीतर्फे निशाणी क्र. ३ यादीसोबत एकुण ५ व नि. २० सोबत ५ अशी कागदपत्रे सादर केली आहेत. सदर कागदपत्रांची आवश्यकता भासेल त्या ठिकाणी उल्लेख केला जाईल. तर प्रतिवादीतर्फे निशाणी क्र. १८ सोबत एकुण ११ कागदपत्रे सादर केलेली असून त्यांची आवश्यकता भासेल त्या ठिकाणी उल्लेख केला जाईल.

**१३.** प्रथमदर्शनी अभिलेखावरील पुरावा विचारात घेता, प्रस्तूत प्रकरणात वादी व प्रतिवादी त्यांच्या एकमेकांच्या मिळकतीवरील मालकी हक्क व कब्जा याबाबत वाद असल्याचे दिसून येत नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचा मुख्य मुद्दा हा वादींच्या जमीनीमधून प्रतिवादींना रस्ता मिळण्याच्या हक्का संबंधी आहे. वादीच्या दाव्यातील कथनानुसार वादीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही

प्रकारचा रस्ता उपलब्ध नसून प्रतिवादींना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. याउलट प्रतिवादीच्या कथनानुसार वाद रस्ता व्यतिरीक्त त्यांना त्यांच्या मिळकतमधून जाण्यासाठी पूर्वापार एकमेव रस्ता असून इतर कोणताही व्यवहारी मार्ग उपलब्ध नाही. प्रस्तूत प्रकरणातील वादाचे स्वरुप विचारात घेता वादीचा मुख्य आक्षेप तहसीलदार यांच्या दि. २५.०७.२०२५ रोजीच्या निकालासंबंधी असल्याने प्रथमदर्शनी सदर निकालाची वैधता तपासणे आवश्यक ठरते.

**१४.** वादी तर्फे अभिलेखावर जमीन/रस्ता १४३/ एस आर / १७२४/ दि. २५.०७.२०२५ रोजीची तहसिलदार यांच्या निकालाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर निकालपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी रावसाहेब यांनी तहसिलदार कवठे महांकाळ यांच्याकडे गट नं. १७६ मध्ये जाण्या–येण्यासाठी गट नं. २६ चे पूर्व बाजूने बांधावर गाडी रस्ता मिळावा याबाबत अर्ज दाखल केला होता. प्रस्तूत प्रकरणातील वादी क्र. १ ते ५ हे त्या प्रकरणातील जाबदार म्हणून समाविष्ट होते. तहसिलदार यांनी दोन्ही पक्षांना अर्जाची नोटीस देऊन त्यांचे लेखी म्हणणे घेतले होते. प्रस्तुत वादी यांनी सदर अर्जावर लेखी म्हणणे सादर केले असल्याचे आदेशावरुन सकृतदर्शनी दिसत आहे. झालेल्या सुनावणीचे स्वरुप व गुणवत्ता हा मुद्दा अंतिम टप्प्यावर तपासता येईल, परंतु या टप्प्यावर प्रस्तुत वादींना तहसीलदार यांनी म्हणणे देण्याची संधी दिली नाही हा युक्तिवाद प्रथमदर्शनी ग्राह्य धरता येणार नाही.

**१५.** प्रतिवादी तर्फे सदर संपूर्ण प्रकरणाच्या रोजनाम्याची प्रमाणीत प्रत अभिलेखावर सादर केलेली आहे. दि. १२.१२.२०२४ रोजीच्या रोजनाम्यातील

नोंदीनुसार स्थळ पाहणी केली अशी नोंद असून त्यापूढे अर्जदार व सामनेवाला यांच्या रखाण्यामध्ये, दोन्ही पक्षांच्या स्वाक्षऱ्या घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. याशिवाय दि. २५.०७.२०२५ रोजीच्या न्यायनिर्णयामध्ये देखील अर्जदार व जाबदार यांचे लेखी म्हणणे व प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्याचे नमुद आहे. त्यामुळे तहसिलदार यांनी कोणतीही स्थळ पाहणी न करता आदेश पारीत केला होता, या कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसत नाही.

**१६.** वादींचा पुढील युक्तिवाद असा आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ अंतर्गत रस्ता देताना केवळ गट नंबरच्या मुख्य बांधावरून रस्ता देता येतो. सरबांधावरून रस्ता देण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे तहसीलदारांचा आदेश बेकायदेशीर आहे. सदर युक्तिवादाचा विचार करता, प्रथम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३ ची व्याप्ती व उद्देश समजून घेणे आवश्यक आहे. सदर तरतूद ही एखाद्या शेतजमिनीला जाणे–येणे करण्यासाठी आवश्यक मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी आहे. सदर तरतूदींनुसार रस्ता देताना मुख्य बांध किंवा सरबांध असा कोणताही स्पष्ट भेद किंवा बंधनकारक अट नमूद केलेली नाही. त्यामुळे हा निर्णय हा प्रशासकीय विवेकाधिकाराच्या कक्षेत येणारा आहे. सबब, केवळ सरबांधावरून रस्ता दिला आहे या कारणावरून तहसीलदारांचा आदेश बेकायदेशीर ठरत नाही.

**१७.** वादीतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रतिवादींना त्यांच्या गट नं. १७६ मध्ये जाण्यासाठी उत्तरेकडून किंवा ओढ्यालगत पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. त्यामुळे वादींच्या जमिनीतून रस्ता देण्याची कोणतीही

आवश्यकता नाही. सदर युक्तिवादाचा विचार करता, कायद्याच्या दृष्टीने केवळ एखादा मार्ग अस्तित्वात आहे एवढे पुरेसे नसून तो मार्ग व्यवहार्य, सुरक्षित व नियमित वापरास योग्य (practicable and convenient) असणे आवश्यक आहे. एखादा मार्ग केवळ तात्पुरता, हंगामी किंवा अडथळ्यांनी युक्त असल्यास तो "पर्यायी रस्ता" म्हणून ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. तहसीलदारांनी निकालापुर्वी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून ओढा, पाण्याचा प्रवाह, चढ–उतार, झाडी व भौगोलिक अडथळे यांचा सविस्तर विचार केला असल्याचे निकालावरुन प्रथमदर्शनी दिसत आहे. आदेशात नमूद केल्याप्रमाणे, ओढ्याच्या पात्रात पाणी साचते, त्या ठिकाणी बंधारा आहे व मार्गावर चढ–उतार असल्यामुळे चारचाकी वाहनांची ये–जा शक्य नाही. त्यामुळे त्यांना नियमित व सुरक्षित ये–जा करण्यासाठी रस्ता आवश्यक आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. या टप्प्यावर तहसीलदारांचा निष्कर्ष हा प्रत्यक्ष पाहणीवर आधारित असुन वादींनी त्यास खोडून काढणारा कोणताही पुरावा प्रथमदर्शनी सादर केलेला नाही. अशा परिस्थितीत वादींचा "पर्यायी रस्ता उपलब्ध आहे" हा युक्तिवाद प्रथमदर्शनी ग्राह्य धरता येत नाही.

१८. वादींचा पुढे असा युक्तीवाद आहे की, तहसीलदारांचा आदेश पोकळ, बनावट व बेकायदेशीर आहे. परंतु, तहसीलदारांच्या आदेशाचे परीक्षण करता, सकृतदर्शनी सदर आदेशामध्ये दोन्ही पक्षांचे म्हणणे, स्थळ पाहणी व परिस्थितीचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच पक्षकारांना पुरेशी संधी देण्यात आलेली असून नैसर्गिक न्यायाचे उल्लंघन दिसून येत नाही. केवळ निष्कर्षांशी वादींची

असहमती असल्यामुळे सदर आदेश बेकायदेशीर ठरत नाही. याशिवाय वादींनी आदेश बनावट असल्याचा कोणताही ठोस पुरावा प्रथमदर्शनी सादर केलेला नाही. सबब वादीच्या या कथनामध्ये प्रथमदर्शनी कोणतेही तथ्य आढळुन येत नाही.

**१९.** प्रतिवादींच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, यापूर्वीही वादींनी रस्ता जमीन/एसआर/३/१९ अन्वये गट नं.२६ मिळकतीस गट नं. ३१,२८, २७, २५/अ व गट नं. २६ पर्यंत सरबांधावरुन पूर्व पश्चिम चालीचा रस्ता मागितला होता. त्या रस्ता वहिवाटी संदर्भात तहसीलदारांकडे प्रकरण चालले होते व दि. ०८/०४/२०२१ रोजी त्या प्रकरणात तडजोड होऊन आदेश पारित करण्यात आला होता. त्या आदेशानुसार हिंगणगाव – करोली मुख्य रस्त्यापासून पूर्व–पश्चीम चालीचा गट नं. २७ चे दक्षिण बाजूने गट नं. २५/ब चे बांधापर्यंत अस्तीत्वात असलेल्या रस्त्याचा वापर करण्याबाबत आदेश झाला होता. व सदर रस्ता पुढे प्रतिवादींच्या गट नं. १७६ पर्यंत जाण्यासाठी याप्रकरणात तहसीलदार यांनी विस्तारीत रस्ता म्हणून मंजूर केलेला आहे, असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

**२०.** सदर आदेशाची प्रमाणीत प्रत प्रतिवादींतर्फे अभिलेखावर सादर केलेली आहे. सदर निकालाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, दि. ०८/०४/२०२१ रोजीच्या रस्ता जमीन/एसआर/३/१९ मधील आदेशानुसार गट नं. २७ चे दक्षिण बाजूने गट नं. २५/ब चे बांधापर्यंत अस्तीत्वात असलेल्या रस्त्याचा वापर करावा असे नमुद केलेले आहे. ही बाब प्रथमदर्शनी असे दर्शविते की, गट नं. २५/ब चे बांधापर्यंत पूर्वीपासून रस्ता अस्तीत्वात होता.

याशिवाय, सदर प्रकरणामध्ये झालेल्या तडजोडीनुसार संबंधित पक्षांनी स्वतःच्या जमिनी सरकवून रस्ता निर्माण करण्यास सहमती दर्शविली असल्याचे दिसत आहे. यावरून असे दिसते की, त्या वेळी पक्षकारांनी परस्पर सोयीसाठी व व्यवहार्यतेसाठी रस्ता आवश्यक असल्याचे मान्य केले होते. तसेच, सदर तडजोडीच्या आदेशानुसार रस्ता गट नं. २५/ब पर्यंत उपलब्ध झाला होता. वर चर्चा केल्याप्रमाणे तहसिलदार यांनी सन २०२१ साली गट नं. २५/ब पर्यंत रस्ता मंजूर केलेला आहे तोच रस्ता प्रत्यक्षात पुढे गट नं. १७६ पर्यंत पोहोचण्यासाठी अपूर्ण असल्याने दि. २५.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये तहसीलदार यांनी रस्ता दिला असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे.

**२१.** उपरोक्त बाबींचा विचार करता असे दिसते की, सदर भागात रस्ता हा पूर्णतः नवीन नसून पूर्वीपासून काही प्रमाणात अस्तित्वात असल्याचे प्रथम दर्शनी दर्शविले गेले आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे तहसीलदारांच्या आदेशातही गट नं. २५/ब पर्यंत रस्ता अस्तित्वात असल्याचा उल्लेख आहे. तसेच सन १९८० मधील रस्ता वहिवाट प्रकरण, ग्रामपंचायत नोंदी व पंचायत समितीच्या कामाचा उल्लेख याबाबतचे दस्त प्रतिवादींनी अभिलेखावर सादर केलेले आहेत. या सर्व बाबी एकत्रित विचारात घेतल्या असता, रस्त्याची संकल्पना ही नव्याने निर्माण झालेली नसून, ती पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या वहिवाटीचा भाग असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे जमीन/ रस्ता१४३/एसआर *१७/*२०२४ दिनांक २५/०७/२०२५ मधील तहसीलदारांचा आदेश हा नवीन रस्ता निर्माण करण्यापेक्षा, आधीपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्याचा आवश्यक विस्तार केला

असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

**२२.** रस्ता जमीन/एसआर/३/१९ दि. ०८/०४/२०२१ रोजीचा तहसिलदार यांचा आदेश रद्द झाल्याबाबतचा कोणताही पुरावा, सकृतदर्शनी वादीतर्फे अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. महत्वाची बाब म्हणजे आज रोजी वादींकडून संपुर्ण रस्त्याचे अस्तित्व नाकारला जात असुन, सदर बाब त्यांच्याच पूर्वीच्या वर्तनाशी विसंगत दिसते. याशिवाय वादींनी रस्ता जमीन/एसआर/३/१९ ०८/०४/२०२१ रोजीच्या तहसीलदार यांच्या आदेशाबाबत अथवा त्याअनुशंगाने दाखल केलेल्या प्रकरणांबाबतचा कोणताही उल्लेख प्रस्तुत अर्जामध्ये अथवा दाव्यामध्ये केलेला नाही. सदरच्या बाबी प्रतिवादींनी न्यायालयासमोर सादर केलेल्या आहेत. वादींनी सदर बाबी लपावल्या असल्यामुळे वादींच्या दाव्याची विश्वासार्हता कमी होते.

**२३.** उपरोक्त चर्चीलेल्या बाबी विचारात घेता, वादीच्या अर्जातील कथनाप्रमाणे तहसीलदार यांच्या प्रथमदर्शनी कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, वादीस प्रथमदर्शनी केस आहे असा निष्कर्ष निघत नाही. सबब मुद्दा क्र. १ नकारार्थी स्वरुपात उत्तरीत करीत आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबत –**

**२४.** सदर प्रकरणात वादींचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या जमिनीमधून रस्ता केल्यास त्यांच्या पिकांचे व झाडांचे नुकसान होईल. तथापि, प्रतिवादींच्या बाबतीत विचार करता, त्यांच्या गट नं. १७६ मध्ये राहती वस्ती व जनावरांचा गोठा असल्याचे अभिलेखावरून दिसते. जर त्यांना रस्ता उपलब्ध झाला नाही,

तर त्यांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीत जाणे–येणे अशक्य होईल व त्यांचे दैनंदिन जीवन व शेती बाधित होईल. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, प्रतिवादींना होणारे नुकसान अधिक गंभीर व प्रत्यक्ष स्वरूपाचे आहे. वादींचा दावा आहे की, त्यांच्या पिकांचे नुकसान होईल. परंतु, तशी पिके असल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रथम दर्शनी वादीतर्फे सादर करण्यात आलेला नाही. वादाकरिता जरी वादींची वादमिळकतीमध्ये पिके असल्याची बाब मान्य केली तरीही, असे होणारे नुकसान हे आर्थिक स्वरुपातील असून त्याची भरपाई पैस्याने करता येऊ शकते. सबब सोयीचा समतोल व दोन्ही कल प्रतिवादीच्या बाजूने झुकणारे आहेत. सबब मी मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा नि. क्र. ०५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावयाचा आहे.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.04.02 12:07:02 +0530

**दिनांक – ०१.०४.२०२६** **( एम. ए. कुलकर्णी )**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 01.04.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 01.04.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 02.04.2026 |